**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**
**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)**
**(०२३५८) २८२३८७**

अंक ०३/२०१८ दिनांक ०९/०१/२०१८ कालावधी ५ दिवस


| | | |
|---|---|---|
| **डॉ. सुभाष चव्हाण,** | **डॉ. ज्ञानेश्वर जगताप,** | **प्रा. विरेश चव्हाण,** |
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी, |
| कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग |
| ९४२२४३१०६७ | ९४०३९८८१४३ | ९४२२०६५३४४ |


**मागील हवामान सारांश**
**दि. ०५/०१/२०१८ ते ०९/०१/२०१८**

| | | |
|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | |
| पाऊस (मिमी) १/१/१८ पासून | : | |
| पाऊस (मिमी) (गेल्या वर्षी) | : | |
| कमाल तापमान (अं.से) | : | |
| किमान तापमान (अं.से) | : | |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | |

**हवामान पूर्वानुमान (१०/०१/२०१८ सकाळी ८:३० पासून १४/०१/२०१८ सकाळी ८:३० वाजेपर्यंत)**

| हवामानांचे घटक | : | १०/०१ | ११/०१ | १२/०१ | १३/०१ | १४/०१ |
|---|---|---|---|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | ० | ० | ० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से) | : | २७ | २८ | २७ | २८ | २९ |
| किमान तापमान (अं.से) | : | १८ | १९ | २० | २० | २१ |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | : | ० | १ | १ | ० | ० |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ८२ | ७९ | ८१ | ८५ | ८६ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ५८ | ५८ | ५९ | ५७ | ५८ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ००६ | ००६ | ००५ | ००५ | ००४ |
| वाऱ्याची दिशा | : | नै.प. | नै.द. | नै.द. | नै.द. | नै.प. |

**:हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला:**

**दिनांक ११ व १२ जानेवारी २०१७ रोजी अवकाश अंशत: मेघाच्छादित राहिल. दिनांक १० ते १४ जानेवारी, २०१७ पर्यंत वाऱ्याचा वेग ४ ते ६ किमी प्रति तास राहिल.**

| पिक | पिक अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **उन्हाळी भात** | रोपवाटीका | • रब्बी–उन्हाळी हंगामात भात पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांनी भात पीक रोपवाटिकेची पेरणी करून १५ दिवस झाले असल्यास रोपवाटीकेस प्रति गुंठा क्षेत्रास १ किलो युरिया खताचा दुसरा हप्ता द्यावा. |
| **भुईमूग / मोहरी** | अंकुरावस्था | • रब्बी उन्हाळी भुईमुग लागवडीसाठी शेताच्या पूर्वतयारीची कामे हाती घ्यावीत. जमीन खोल नांगरुन, ढेकळे फोडून व हेक्टरी १० ते १५ टन चांगले कुजलेले शेणखत/कंपोस्ट मिसळून तयार करावी. पेरणीसाठी टी.जी. २६, टी.ए.जी. २४, टी.पी.जी. ४१, कोकण गौरव, कोकण टपोरा या जातींचे बियाणे हेक्टरी १२५ ते १५० किलो या प्रमाणत वापरावे.<br>• मोहरी पीकाच्या पेरणीसाठी हवामान योग्य असल्याने **पुसा बोल्ड** किंवा **वरुणा** या जातीची लागवड करावी. पीकाची पेरणी ४५ X १० से.मी. अंतरावर ३ ते ४ से.मी. खोल करावी. पेरणीपूर्वी प्रती गुंठयास १ किलो युरीया आणि ३ किलो सिंगल सुपर फॉस्फेट ओळीत पेरुन दयावे. |
| **आंबा, काजू** | **वाढीची अवस्था** | • आंबा बागांमध्ये तुडतुडयांचा प्रादुर्भाव झाल्यास त्याच्या नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के प्रवाही ३ मिली तसेच भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी हेक्झाकोनॅझोल ५ टक्के ५ मिली किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.<br>• काजूवर ढेकण्याचा (टी मॉस्किटो) प्रादुर्भाव झाल्यास त्याच्या नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ५ टक्के प्रवाही ६ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून नवीन पालवी फुटण्याच्यावेळी फवारणी करावी.<br>(सदर नमुद केलेले किटकनाशक लेबलक्लेम नाही.) |
| **नारळ/ सुपारी** | –– | • नारळावरील गेंडाभुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये शेणखताच्या खड्डयात दर दोन महिन्यांनी मिथील पॅरॅथिऑन २ टक्के भुकटी मिसळावी.<br>• नारळावरील सोंडया भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी खोडावर १ मिटर उंचीवर गिरमिटाच्या सहाय्याने १५ ते २० सें.मी. खोल तिरपे भोक पाडून त्यामध्ये २० टक्के प्रवाही क्लोरोपायरीफॉस नरसळयाच्या सहाय्याने ओतावे आणि भोक सिमेंटच्या सहाय्याने बंद करावे. |
| **भाजीपाला आणि कलिंगड लागवड** | | • वांगी, मिरची व टोमॅटोच्या रोपांचे जीवाणूजन्य मर या रोगांपासून संरक्षण करण्याकरिता ज्या गादीवाफ्यावर बिया पेरावयाच्या आहेत त्या ठिकाणी पेरणीपूर्वी कॉपर ऑक्झीक्लोराइडचे २ ते २.५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यातून वाफ्यावर फवारणी करावी. तसेच वाफ्याच्या बाजून मुंग्यांच्या बंदोबस्तासाठी कार्बारील भुकटी किंवा लिंडेन भुकटी टाकावी. पेरणीपूर्वी १ किलो बियाण्यांस ३ ग्रॅम थायरम बुरशीनाशक चोळावे.<br>• भाजीपाला (वांगी, टोमॅटो, मिरची व नवलकोल) पिकांमध्ये भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनझोल ५ मिली किंवा ८० टक्के पाण्यात मिसळणारी गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारावे.<br>• कलिंगडाची लागवड करण्यासाठी जमिन नांगरून कुळवून लागवडीसाठी तयार करावी. लागवडीसाठी ४ मीटर अंतरावर पाट किंवा सऱ्या काढाव्यात. पाटाच्या दोन्ही बाजूस ९० सें.मी. अंतरावर ३० X ३० X ३० सें.मी. आकाराचे खड्डे करून त्यात १ ते १.५ किलो चांगले कुजलेले शेणखत व १० ग्रॅम कार्बारील (१०टक्के) पावडर मिसळून खड्डा भरून घ्यावा. प्रत्येक खड्डयात ३–४ बिया एकमेकापासून ४–५ सें.मी. अंतरावर व २ ते २.५ सें.मी. खोलीवर लावाव्यात रूजवा झाल्यानंतर १५ दिवसांनी रोपांची विरळणी करून प्रत्येक ठिकाणी २ चांगली जोमदार रोपे ठेवावीत. या पिकाला प्रती हेक्टरी १५० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश याची मात्रा द्यावी. स्फुरद आणि पालाश याची संपुर्ण मात्रा व नत्राची १/३ मात्रा पेरणीच्या वेळेस द्यावी. उर्वरीत नत्राची मात्रा समप्रमाणत विभागून १ व २ महिन्यांनी लागवडीनंतर द्यावी. |
| **दुभती जनावरे/ शेळया** | – | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी पुरवठयाची व्यवस्था करावी.<br>• किमान तापमान कमी होत असल्यामुळे गुरांच्या गोठयात तसेच कोंबडयाच्या शेड मध्ये गरजेनुसार विजेचे बल्प आणि शेडभोवती पडदे गुडांळावेत. |
| **सुचना** | – | • निरनिराळे किडी, रोग जास्त प्रमाणात आढळल्यास नजिकच्या कृषि विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. |